# नागपूर महानगरपालिका, नागपूर

## (जनसंपर्क विभाग)

<u>**प्रसिद्धी पत्रक ता. २४ एप्रिल २०१९**</u>

# जागतिक हिवताप दिनानिमित्त गुरूवारी प्रभातफेरीद्वारे जनजागृती

## दहाही झोनमध्ये प्रदर्शनी व विविध कार्यक्रम

**नागपूर, ता. २४ :** नागपूर महानगरपालिकेच्या हिवताप व हत्तीरोग विभागामार्फत जागतिक हिवताप दिनानिमित्त गुरूवारी (ता.२५) शहरातील दहाही झोनमध्ये प्रभातफेरीद्वारे जनजागृती करण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक झोनमध्ये वर्दळीच्या विविध भागात प्रदर्शनी लावून नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्यात येणार आहे.

गुरूवारी (ता.२५) सकाळी ७ वाजता लक्ष्मीनगर झोनमधील जयताळा, धरमपेठ झोनमधील मानव सेवानगर, हनुमाननगर झोनमधील दुबेनगर, भाग्यश्री नगर, हुडकेश्वर, धंतोली झोनमधील नरेंद्रनगर, नेहरूनगर झोनमधील दिघोरी, गांधीबाग झोनमधील मोमीनपूरा, सतरंजीपुरा झोनमधील मुदलियार

चौक, शांतीनगर, लकडगंज झोनमधील सुभान नगर, नेताजीनगर, आसीनगर झोनमधील वैशालीनगर व मंगळवारी झोनमधील मानकापूर या भागामधून प्रभातफेरी काढण्यात येईल. तर त्रिमूर्तीनगर येथील गजानन मंदिर, काटोल मार्गावरील जागृती कॉलनी, दुबेनगर, भाग्यश्री नगर, हुडकेश्वर, गणेशपेठ, वाठोडा येथील साईबाबानगर, महाल येथील नवीन शुक्रवारी, आनंदनगर बिनाकी लेआउट, भवानीनगर पारडी, लष्करीबाग, शंभुनगर, झिंगाबाई टाकळी या ठिकाणी सकाळी सात ते १० दरम्यान हिवताप जनजागृतीसंबंधी प्रदर्शनी लावण्यात येणार आहे.

जागतिक हिवताप दिनानिमित्त मनपाच्या हिवताप व हत्तीरोग विभागामार्फत २५ ते ३० एप्रिल दरम्यान विविध कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. गुरूवारी (ता.२५) प्रभातफेरी व प्रदर्शनी, शुक्रवारी (ता.२६) जलद ताप सर्वेक्षण, शनिवारी (ता.२७) डेंग्यू रूग्ण निघालेल्या भागात प्रदर्शनी लावणे, सोमवारी (ता.२९) गप्पीमासे सोडण्याची धडक मोहिम, मंगळवारी (ता.३०) गर्दीच्या ठिकाणी सभा घेउन आरोग्य शिक्षण देणे असे विविध कार्यक्रम यानिमित्ताने घेण्यात येणार असल्याची माहिती मनपाच्या हिवताप व हत्तीरोग विभागाच्या वतीने देण्यात आली.